Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Kolhapur-416004

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, 539, राजेंद्रनगर, कोल्हापूर-416 004**

**दूरध्वनी क्र** - (0231) 2696101 / 2 / 3 **Website** - www.sscboardkolhapur.in **Email** - divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं / लेखा / परीक्षा फी / फेब्रु - मार्च 2024 / 2357 दिनांक : 22 / 11 / 2023 30

## अत्यंत महत्वाचे

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक विद्यालय,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय : फेब्रु / मार्च 2024 माध्यमिक (इ.10 वी) प्रमाणपत्र परीक्षेचे परीक्षा शुल्क संगणकीय चलन Download करून चलनावरील Bank of India Virtual Account मध्ये NEFT / RTGS द्वारे भरणा करणेबाबत.**

**संदर्भ : राज्य मंडळाचे क्र. रा.मं. / परीक्षा-3 / 5077, दिनांक 20.11.2023 चे पत्र.**

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, फेब्रु / मार्च 2024 माध्यमिक शालान्त (इ.10 वी) प्रमाणपत्र परीक्षेची आवेदनपत्रे नियमित शुल्कानुसार सादर करणेकरिता दिनांक 23 नोव्हेंबर 2023 ते 11 डिसेंबर 2023 पर्यंत संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

ऑनलाईन आवेदनपत्रे सादर केल्यानंतर बँकेत शुल्क भरण्याच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत

| | |
|---|---|
| **माध्यमिक शाळांनी चलन Download करून शुल्क भरण्याच्या तारखा** | **गुरुवार दिनांक 23 नोव्हेंबर 2023<br>ते<br>सोमवार दिनांक 11डिसेंबर 2023** |

या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांनी आवेदनपत्रे सादर केलेल्या **सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क संगणकीय चलन Download करून चलनावरील Bank of India Virtual Account मध्ये NEFT / RTGS द्वारे भरावयाचे आहे.**

***निळया चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्यात येवू नये***

तसेच NEFT / RTGS द्वारे परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतरही काही तांत्रिका कारणामुळे सदर रक्कम मंडळाच्या बॅक खात्यात जमा न होता संबंधित शाळेच्या बँक खात्यात परत (Return) जात असल्याचे निदर्शनास आलेले आहे. ज्या माध्यमिक शाळेचे बँक खाते Bank of India या बँकेत आहे त्या शाळेने परीक्षा फी Bank of India च्या चलनाद्वारे Transfer करावी.

*** **तरी सर्व माध्यमिक शाळांनी परीक्षा शुल्क NEFT / RTGS द्वारे भरणा केल्यानंतर दुसऱ्या दिवशी बॅक स्टेटमेंटची पडताळणी करून परीक्षा शुल्काची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याची खातरजमा करावी. जर परीक्षा शुल्काची रक्कम मंडळाच्या Virtual Account मध्ये जमा न होता आपल्या खात्यात जमा झाली असल्यास त्वरीत सदर परीक्षा शुल्काची रक्कम संगणकीय चलनावरील Virtual Account मध्ये पुन:श्च NEFT / RTGS द्वारे भरणा करण्याची दक्षता घ्यावी.**

(डी. एस. पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर